संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# मूलभूत गरजा आता हक्क आणि अधिकार झाला पाहिजे

अन्न, वस्त्र, निवारा या समाजाच्या मूलभूत गरजा आहेत असे मानले जाते, परंतु आता ही व्याख्या बदलली पाहिजे. केवळ अन्न, वस्त्र निवाराच नव्हे तर शिक्षण, आरोग्य, रस्ते, पाणी, वीज या गोष्टीसुध्दा समाजाच्या गरजा आहेत. खरे तर या गोष्टी केवळ गरजा नसून, समाजाचा अधिकार किंवा हक्क झाल्या आहेत. कारण कोणत्याही सुसंस्कृत समाजामध्ये कोणत्याही व्यक्तीला किमान आयुष्य किंवा जीवन जगायचे असेल तर, त्याला या मूलभूत सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. दुर्दैवाने आपल्या देशात अजूनही या गोष्टींकडे हक्क किंवा अधिकार म्हणून न पाहता गरजा म्हणून पाहिले जाते आणि त्या पूर्ण केल्याच पाहिजेत, अशी कोणतीच जबाबदारी सरकार किंवा शासन स्वीकारायला तयार नसतात. आज देशात काय किंवा महाराष्ट्रात काय हे चित्र आपल्याला स्पष्टपणे दिसते. नुकत्याच झालेल्या जनगणनेमध्ये देशातील २५ कोटी लोक बेघर असल्याचे दिसून आले आहे. तर देशातील ४० टक्के गावांना पक्के रस्तेदेखील नाहीत. देशाच्या ७० टक्के भागामध्ये पिण्याचे शुध्द पाणी मिळत नाही. तर ६० टक्के भागात अजूनही शिक्षण आरोग्याच्या परिपूर्ण सुविधा निर्माण झालेल्या नाहीत.

त्यावरून ज्यांना आपण समाजाच्या मूलभूत गरजा म्हणतो, त्यादेखील पूर्ण होऊ शकलेल्या नाहीत हे सिध्द होते. म्हणूनच आता या गोष्टींना केवळ गरजा म्हणून चालणार नाही, तर तो प्रत्येक व्यक्तीचा किंवा समाजाचा हक्क झाला पाहिजे. तो देण्याचे कायदेशीर बंधन सरकारवर किंवा सत्ताधाऱ्यांवर टाकले गेले पाहिजे. एका ठरावीक काळामध्ये त्या त्या गावात किंवा शहरामध्ये लोकांना त्यांचे हे हक्क मिळाले नाही तर, त्याबद्दल सत्ताधाऱ्यांनादेखील दंड करण्याची कायदेशीर तरतूद केली गेली पाहिजे. आज अशी कोणतीही कायदेशीर व्यवस्था नसल्यामुळे राजकर्ते बेजबाबदारपणे वागत राहिले आणि त्याचा भूरदंड किंवा फटका सामान्य जनतेला बसत गेला. आता समाज जागा झाला आहे त्याला त्याच्या अधिकाराची आणि कर्तव्याची जाणीव झाली पाहिजे.

### बेजबाबदार शासन

या संदर्भात वेगवेगळी उदाहरणे देता येतील, परंतु आपल्याच महाराष्ट्रातील उदाहरण द्यायचे झाले तर सध्या सुरू असलेल्या गृहनिर्माण योजनांविषयी देता येईल. सामान्य नागरिकाला परवडणारे घर मिळावे म्हणून, अनेक योजना जाहीर होतात तरीदेखील सामान्य माणूस त्यापासून वंचित राहतो. कारण जी काही धोरणे राबविली जातात ती बऱ्याच वेळेला बिल्डरांचे किंवा मोठ्या उद्योगपतीचे भले करणारी असतात. सरकारने अनेक वेळेला गृहनिर्माण धोरण राबविले, परंतु ते कधीही परिपूर्ण ठरले नाही. त्यामध्ये सतत बदल होत गेले. नवे सरकार नवे धोरण असे त्याचे स्वरूप होत जाते. आतादेखील केंद्रामध्ये नवे सरकार आल्यानंतर त्यांनी नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर केले आणि ते इतर राज्यांनीदेखील राबवावे असे सांगितले गेले. तर महाराष्ट्रासारख्या राज्याने स्वत:चे वेगळे गृहनिर्माण धोरण तयार केले. या दोघांचाही हेतू एकच होता. समान्य माणसाला परवडणारी घरे मिळाली. परंतु आता महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारचे गृहनिर्माण धोरण पाहिजे तितके कठोर नाही, असा युक्तिवाद केला आहे. याचा अर्थ निवाऱ्यासारखी समाजाची मूलभूत गरज पूर्ण करण्याकरितासुध्दा किती दिरंगाई केली जाते, हे यावरून दिसून येते कारण घर किंवा निवारा ही समाजाची गरज आहे, असे एकदा मानल्यानंतर ती तितक्या वेगाने पूर्ण केलीच पाहिजे, अशी जबाबदारी शासनकर्ते मानत नाहीत. केवळ धोरणे जाहीर करणे आणि त्याची अंमलबजावणी मात्र मनमानी पध्दतीने करणे यामुळे सामान्य माणसाला त्याचा योग्यवेळी लाभ मिळत नाही.

### अजूनही प्रश्न कायम

तीच परिस्थिती आज शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी, रस्ते याबाबत पहायला मिळते. आजही ग्रामीण भागात किंवा आदिवासी भागात लोकांना सकस अन्न मिळत नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात दरवर्षी ३० हजार लहान बालके कुपोषणामुळे दगावतात. अनेकांना वेळेवर उपचार उपलब्ध होत नाहीत. काही भागामध्ये तर वीज नसल्यामुळे तातडीचे उपचारसुध्दा करता येत नाहीत. स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षे झाली, परंतु अजूनही समाजाच्या समस्या सुटलेल्या नाहीत. काळ बदलला, लोकांच्या हातात मोबाईल आले, इंटरनेटचा जमाना आला, परंतु जर गावात वीज नसेल तर, त्याचा काही उपयोग नाही. शुध्द पिण्याचे पाणी नसल्यामुळे आरोग्याच्या अनेक तक्रारी आपोआप निर्माण होतात, असा हा समस्यांचा चक्रव्यूह राज्यकर्त्यांना भेदता आलेला नाही. कारण या गोष्टी म्हणजे समाजाचा अधिकार आहे किंवा हक्क आहे, हेच आमच्या राज्यकर्त्यांनी कधी स्वीकारले नाही. ती समाजाची गरज आहे आणि पूर्ण केलीच पाहिजे, अशी त्यांच्यावर कोणतीही जबरदस्ती नाही या गोष्टीचा गैरफायदा घेतला गेला. शासनकर्ते बेजबाबदार राहिले आणि समाज वाऱ्यावर सोडून दिला गेला.

आता तरी समाजाने पुढाकार घेऊन या हक्कांसाठी लढा दिला पाहिजे. आपल्या देशाच्या घटनेमध्ये प्रत्येक नागरिकाला जगण्याचा हक्क दिला गेला आहे. अलीकडेच त्याला शिक्षणाचादेखील वेगळा हक्क दिला गेला आहे. परंतु अन्य मूलभूत सुविधांचे हक्क त्याला केव्हा मिळणार, हा प्रश्न अजूनही कायम आहे. आजच्या परिस्थितीचा विचार केला तर, या महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष होत राहते.आणि आता सामाजिक महत्त्वाच्या विषयावर टाळण्याचा प्रयत्न होतो, असे म्हणता येईल. शासकीय पातळीवरसुध्दा ही गोष्ट जाणवत असते. परंतु त्याची गंभीरता स्वीकारली जात नाही. आणि जोपर्यंत सरकारी पातळीवर या गोष्टींचे भान लक्षात आणून दिले जात नाहीत, तोपर्यंत त्याला महत्त्व प्राप्त होणार नाही किंवा ते कृतीत उतरणार नाही.